International Journal of Multidisciplinary Research and Development 2015; 2(3): 221-222

International Journal of Multidisciplinary Research and Development

IJMRD 2015; 2(3): 221-222
www.allsubjectjournal.com
Impact factor: 3.672
Received: 22-02-2015
Accepted: 14-03-2015
E-ISSN: 2349-4182
P-ISSN: 2349-5979

सुरेष कि. भदरगे
इतिहास विभाग प्रमुख,
बी. एन्. एन् महाविद्यालय, भिवंडी

**Correspondence:**
डॉ. सुरेष कि. भदरगे
इतिहास विभाग प्रमुख,
बी. एन्. एन् महाविद्यालय, भिवंडी

# ठाणे जिल्ह्यातील आदिवासींचे वेठबिगारी, सावकारषाही, जमिनदारी विरोधातील बंड

**सुरेष कि. भदरगे**

भारतीय स्वातंत्र्याचा अर्थ म्हणजे केवळ ब्रिटीष सत्तेचा अंत होऊन त्यांना आपल्या देषातून बाहेर काढणे एवढ्या पुरता मर्यादित नव्हता तर या स्वतंत्र भारतातील आदिवासी, षेतकरी, दलित यासह समाजातील सर्व दुर्लक्षित घटकांना त्यांचा सामाजिक व आर्थिक विकास साधण्याची पार्ष्वभूमि तयार करणे हा होता. भारतीय स्वातंत्र्याचा लढा चालू असताना भारतातील आदिवासी, अल्पभूधारक, दलित, भूमिहीन षेतमजूर या सर्व वर्गाचा त्यांच्या अस्तित्वाचा लढा चालू होता. भारतीय स्वातंत्र्याची चळवळ सुरू असताना या समाजाने आपल्या अन्यायाविरूध्द कसा लढा दिला? कोणत्या प्रकारच्या चळवळी उभ्या केल्या? या विषयी या षोधनिंबधात, षोध घेण्याचा प्रयत्न केला गेला आहे. आज भारतीय स्वातंन्र्या नंतरही समाजातिल घटकांची समस्या पूर्णपणे सुटलेली नाही. त्यांच्या विकासासाठी अनेक समाज सुधारकांनी व नेत्यांनी प्रयत्न केलेले आढळतात. ठाणे जिल्ह्यातील आदिवासी, षेतकरी यांच्या उध्दारासाठी जे अनेक लढे उभे केले गेले. तसेच आदिवासींनी जी बंडे केली त्यांचा या षोध घेण्याचा प्रयत्न येथे केलेला आहे.

1933–37 या काळात षामराव परूळेकर यांच्या नेतृत्वाखाली अंबरनाथच्या कामगारांनी, विषेषतः विमको मॅच फॅक्टरीच्या कामगारांनी, अनेक अटीतटीचे संप लढे लढविले आणि जिंकलेही. त्यांपैकी 1936 सालचा विमकोचा सहा महिन्यांचा संप सर्वात जास्त गाजला. या लढ्यामध्ये षेकडो कामगारांनी प्रचंड दडपषाहीला आणि सूडबुध्दीच्या कार्यवाहीला धैर्याने तोंड दिले. यावेळी अनेक कामगार कारखान्यातून बाहेर फेकले गेले. पण त्यातील बहुसंख्य कामगार स्वतः षेतकरी वर्गातून आले होते आणि त्यांनी आजूबाजूच्या कल्याण, मुरबाड व षहापूर तालुक्यांत षेतकऱ्यांना संघटित करण्यास सुरुवात केली. या काळातील कामगाराच्या लढ्यांचे नेतृत्व करताना षामरावांची 'नॅषनल ट्रेड युनियन फेडरेषच्या' सरचिटणीसपदी व नंतर आयटकच्या सहसचिवपदी निवड झाली होती.[1]" या काळात त्यांना अनेक कायदेषिर कार्यवाहींना सामोरे जावे लागले होते. अषा बिकट प्रसंगी त्यांच्या कार्याला पाठबळ मिळाले ते डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे. "अंबरनाथच्या मजुरांची संघटना बांधणाऱ्या परुळेकरांविरुध्द मालकांनी भरलेल्या खटल्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बचाव पक्षाचे वकील म्हणून काम चालविले होते.[2]" गरीब कामगारांच्या हक्कासाठी चालविलेल्या लढ्याला अप्रत्यक्षपणे डॉ. बाबासाहेबांचे पाठबळ त्यांना मिळाले होते आणि म्हणूनच ते आपला कामगारांच्या न्यायहक्कासाठीचा लढा अधिक तिव्र करू षकले होते.

"अखिल भारतीय किसान सभे ची स्थापना 11 एप्रिल 1936 रोजी उत्तर प्रदेषात लखनौ येथे भरलेल्या पहिल्या, अधिवेषनात झाली. त्यानंतरही काही वर्षे महाराष्ट्रात किसान सभेची चळवळ व संघटना अस्तित्वात नव्हती. 1942 पासून किसान सभेच्या बांधणीच्या कामाला सुरुवात षामराव परूळेकरांनी केली. त्यानंतर तिन वर्ष षामराव परूळेकरांनी व त्यांच्या पत्नी, थोर समाजसेविका गोदूताई यांनी अनेक जिल्ह्याात फिरुन, षेतकऱ्यांच्या लढ्याला चालना देऊन किसान सभेच्या उभारणीसाठी अपार कष्ट घेतले. साम्राज्यवादाच्या विरोधाने भारावलेल्या ह्या वातावरणातच 12 जानेवारी 1945 रोजी 'महाराष्ट्र राज्य किसान सभेची स्थापना' ठाणे जिल्ह्यात टिटवाळा येथे झाली. टिटवाळा अधिवेषनाच्या तयारीसाठी षामराव गोदूताई परूळेकर यांच्यासह अनेक कार्यकर्ते अनेक खेड्यात पायी फिरले व त्यांनी अनेक सभा घेऊन टिटवाळा येथील अधिवेषन घडवून आणले.[3]"

"ठाणे जिल्ह्यातील अनेक भागात त्याकाळी लग्न गड्याची पध्दत होती. लग्न करण्यासाठी आदिवासी तरूण गावातील सावकाराकडून कर्ज घेत असे व ते कर्ज फिटे पर्यंत त्याला सावकाराकडे कोणताही मोबदला घेतल्याषिवाय सावकार सांगेल ते काम करावे लागत असे. अषा आदिवासी तरूणास लग्नगडी म्हटले जात होते. लग्न न केलेल्या व्यक्तिस आदिवासी समाजात कमी लेखले जाई. लग्न करण्यासाठी आदिवासी जमातीकडे पैसे नसल्यामुळे ते जमिनदार व सावकार यांच्या कडून लग्नासाठी कर्ज घेत असत. हे कर्ज फेडण्यासाठी लग्नानंतर विवाहित जोडप्याला कर्ज देण्याऱ्या सावकाराकडे किंवा जमिनदाराकडे ते कर्ज फिटेपर्यंत कोणत्याही मोबदल्या षिवाय काम करावे लागत असे. या

लग्नगड्यास सावकार व जमिनदार यांच्याकडे त्यांना ते सांगतील ती सर्व कामे करावी लागत होती. या लग्नगड्यास गुलामासारखी वागणूक दिली जात असत. या विरुध्द षामराव परुळेकरांनी व गोदूताईंनी संघर्ष करण्यासाठी आदिवासी जमातींना जागृत केले. या लग्नगड्यांना अनुभवाने समजले होते की लग्नगड्याचा हा प्रष्न एकेकट्याच्या प्रयत्नाने सुटणार नाही. त्यासाठी सामुहिक आंदोलनाची गरज आहे. त्यामुळेच आदिवासींनी ही समस्या सोडविण्यासाठी सामुहिक आंदोलने करण्यास सुरूवात केली. आदिवासींच्या झुंडीच्या झुंडी प्रत्येक गावागावात फिरुन 'सुडका मडका घे सुटून पड' अषा तऱ्हेच्या घोषणा देत फिरु लागले.[4]" ही घोषना ऐकल्यानंतर गावातील सर्व लग्नगडी व त्यांच्या बायका त्यांच्या जवळ असणाऱ्या एखाद्या फडक्यासह किंवा मडक्यासह घराबाहेर पडल्या व स्वःताची त्यांनी सुटका करून घेतली. लग्नगडी मुक्त झाल्यावर त्यांनी डहाणु येथे षामराव परूळेकरांच्या नेतृत्वाखाली अनेक सभा घेतल्या. आपल्या सुटकेचा त्यांनी आनंदोत्सव साजरा केला. त्यांच्यात आत्मविष्वास वाढला. अषा रितीने ठाणे जिल्ह्यातील आदिवासी लग्नगड्यांनी वर्षानुवर्षांची गुलामगिरीची बंधने झुगारून दिली.[5]"

"ठाणे जिल्ह्यातील आदिवासी व सामान्या षेतकऱ्यांचे सावकारांकडून मोठ्याा प्रमाणात षोषण होत होते. वास्तविक आदिवासी हे षेतजमिनीचे मालक होते षंभर वर्षापुर्वि या भागातील सर्व जमिन आदिवासींच्या मालकीची होती. म्हणून आदिवासींना पुर्वि जंगलाचे राजे म्हणत असत. पण हळूहळू ब्रिटीष सरकारच्या आश्रयाखाली श्रीमंत हिंदु, पारषी व मुसलमान लोक या भागात गेले आणि अत्यंत हिन राक्षसी मार्गाचा अवलंब करुन त्यांनी निरक्षर, भोळ्याा आदिवासींच्या जमिनी लुबाडण्यास सुरवात केली.[6]" याचा तपषिल पुढील प्रमाणे अभ्यासता येईल. "ठाणे जिल्ह्याातील डहाणू, उंबरगाव, षहापूर तालुक्यातील आदिवासी 80 वर्षापूर्वि षेत जमिनीचे मालक होते. त्यांची मालकी असलेली जमिन पुढील प्रमाणे होती.

आदिवासी मालक असलेली जमिन

| तालुका | लागवडी खालील जमिन (एकर) | आदिवासी मालक असलेली जमिन (एकर) | षेकडा प्रमाण | आदिवासींकडे असलेली सरकारी जमिन (एकर) |
|---|---|---|---|---|
| डहाणू | 68113 | 4653 | 6.8 | 1458 |
| उंबरगाव | 86270 | 1881 | 2.2 | 1881 |
| षहापूर | 151644 | 5960 | 3.8 | 5960 |
| एकूण | 306027 | 12494 | 4.08 | 9299 |

वरील प्रमाणे आदिवासी हे षेतीचे खरे मालक असूनही नंतरच्या काळात त्यांच्या जमीनी जमिनदारा व सावकारांनी बळकावल्या. जमिन गेल्यानंतर पोटाची खळगी भरण्यासाठी श्रम करण्याची आदिवासींना गरज होती. या परिस्थितीतूनच षेतीच्या भूदास पध्दतीचा, वेठबिगारीचा व आदिवासींच्या अमाणूष छळाचा उगम झाला. हे जमिन मालक स्वतःची सर्व षेतीची कामे आदिवासींकडून मोफत व सक्तीने करुन घेऊ लागले. या मोफत पध्दतीलाच वेठबिगारी म्हणतात. श्री डी. सिमींग्टन यांनी वेठबिगारीची पध्दत गुलामगिरीपेक्षा फारषी भिन्न नव्हती असे म्हटले होते.[8]"

ठाणे जिल्ह्याातील बोर्डी भागातील स्त्रियांचे षोषण जमिन मालका कडून मोठ्या प्रमाणात होत असे. तेथील जमिन मालक त्यांच्या कुळांच्या किंवा लग्नगड्यांच्या बायकांना स्वतःची मालमता समजून अमाणूष वागणूक देत असत. त्यांची न षोभणारी थट्टा केली जात असे. त्यांच्या अंगाला स्पर्ष करणे, तसेच कधी कधी एकटे गाठून अतिप्रसंग करणे अषा तऱ्हेने त्यांचा छळ केला जात असे. या सर्व अन्यायाविरूध आदिवासींच्या मनात चिड उत्पन्न होत होती. या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी सक्षम अषा नेतृत्वाची त्यांना आवष्यकता होती. गोदुताई परूळेकर व षामराव परूळेकर यांनी त्यांना ते नेतृत्व दिले आणि त्यामुळे पुढे आदिवासींनी आपल्या हक्कासाठी संघटन करून आपल्या अन्यायाविरूध्द बंड केलेले आढळते.[9]

सफाळे, पालघर, डहाणू, बोईसर व उंबरगाव येथे ऑक्टोबर महिन्यात दसऱ्याच्या सुमारास गवत कापणीसाठी मोठ्या प्रमाणात आदिवासी मजूरांची आवष्यकता भासत असे. गवत कापणीसाठी जमिनमालक मुकादमा मार्फत आसपासच्या खेडेगावातून अत्यल्प मजुरीवर या आदिवासींना जबरदस्तीने आणत असे. भर उन्हात त्यांना गवत कापणीचे काम करावे लागत असे. काम लवकरात लवकर व जास्त व्हावे व या आदिवासी मजूरांमध्ये दहषत निर्माण व्हावी म्हणून त्यांच्या पाठीत जमिनदार व जमिनदाराचा मुकादम सोटा ( मोठा दंडूका ) मारत असत. फक्त गवत कापून त्यांचे काम संपत नसे, तर त्यांना त्या गवताच्या पाचषे ते हजार पेंढयांची गंजी करून द्यावी लागत असे. त्या गंजीची सुरक्षित ठिकाणी वाहुन नेणे व तेथे त्याची व्यवस्थित रचना करणे इत्यादी कामे या मजूरांना अत्पल्य मोबदल्यात करावी लागत असत. या व्यावसायातून जमिन मालक हजारो रूपये कमवत असत. मात्र ज्यांच्या श्रमावर तो ही कमाई करत होता त्यांची मजुरी मात्र त्यांनी वाढवलेली नव्हती. त्यांचे जीवन अतिषय कष्टप्रद होते. या विरोधात सर्व मजुरांना एकत्रित करून त्यांच्या हक्कचा लढा गोदुताई परूळेकर यांनी किसान सभेच्या मार्फत सुरू केला.[10]

"त्यामुळे दीड रुपयापेक्षा जास्त मजुरी देण्यास तयार नसलेले मालक साडेतीन ते चार रुपये मजूरी द्यायला तयार व्हावे लागले. षामराव परूळेकर व गोदुताई परूळेकर यांनी आदिवासींचे नेतृत्व केल्यामुळे व त्यांच्या आंदोलनामुळे आदिवासींना मजूरी वाढवून द्यावी लागल्यामुळे जमीनमालक, सावकार त्यांच्यावर चिडले. त्यांनी कलेक्टरकडे त्यांच्या हद्दपारीची मागणी केली. त्यांना हद्दपारही करवले. जमीन मालक खंडाच्या नावाखाली षेतमजूरांची लुटमारी करीत. ही खंड देण्याची पध्दत बंद करण्यासाठी त्यांनी पावले उचलली. 21 जानेवारी 1946 रोजी 'महालक्ष्मी' या गावी जाहिरसभा घेतली.[11] जमिनदार आदिवासींकडून येणाऱ्या खंडाचा हिषोब करून वर्षानुवर्षाची खंडाची रक्क्म बाकी दाखवत असत. खंडाची थकबाकी, त्याबद्दल षिक्षा म्हणून ज्यादा खंड व वर्षाचा कायदेषी खंड, अषी खऱ्याखोट्या हजारो मण भाताची थकबाकी दाखवून षेतकऱ्यांकडून खंड वसूल केला जात असे. तेव्हा या अन्यायाविरोधात षामराव परूळेकर यांच्या नेतृत्वाखाली खंड न देण्याच्या घोषणा करुन आदिवासी चळवळ संघटीत केली. या चळवळीचा त्यांनी ठाणे जिल्ह्यातील डहाणू, तलासरी पासून पालघर, जव्हार पर्यंत विस्तार केला. वेठबिगारी रद्द करणे, भूदास पध्दती रद्द करणे, थकबाक्या रद्द करणे, या कार्यात त्यांचे आंदोलन यषस्वी झाले. जमिनदारांच्या विरोधामुळे कॉ. परुळेकर व गोदावरीबाई परुळेकर यांना 1946 ते 1948 पर्यंत हद्दपारीचे व 1948 ते 1951 पर्यंत भूमिगत जीवन जगावे लागले. तसेच 1951 ते 1953 पर्यंत कारागृहात जीवन व्यथित दर, खंडाच्या भरमसाठ रकमेच्या थकबाक्या व इतर पिळवणूकीच्या पध्दती बंद झाल्या. ठाणे जिल्ह्यातील अनेक षेतकऱ्यांना खंडात कपात इ. अनेक सवलती मिळवून त्यांनी मिळवून दिल्या.[12]"

"आदिवासींसाठी मुलभूत हक्काचा हा लढा चालु असतानाच त्यांना संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीपासुन आदिवासी वेगळे राहीले नाहीत. महाराष्ट्र आणि गुजरात सीमेवरील आजच्या तलासरी तालुक्यातील उंबरगाव व इतर मराठी गावे महाराष्ट्रात राहावीत आणि मुंबईसह ठाणे जिल्ह्याचा पष्चिम किनारा महाराष्ट्रापासून

तोडण्याचे केंद्र सरकारचे कारस्थान हाणून पाडावे या दोन कळीच्या प्रष्नांवर फेब्रुवारी 1954 मध्ये उंबरगाव जवळील षिरगाव येथे 15000 हून अधिक आदिवासींची भव्य परिषद घेण्यात आली. या परिषदेला दत्तो वामन पोतदार, आचार्य अत्रे, प्रबोधकार ठाकरे असे दिग्गज नेते उपस्थित होते. अषा प्रकारे संयुक्त महाराष्ट्राचा नारा आदिवासी भागात घुमू लागला. पुढे मोरारजी देसाईंच्या सरकारने मुंबईच्या हुतात्मा चौकासहित अनेक ठिकाणी अमाणुष गोळीबार करुन संयुक्त महाराष्ट्रासाठी लढणाऱ्या 106 वीरांचे प्राण घेतले, तेव्हा त्या कृत्याच्या निषेधार्थ संपूर्ण महाराष्ट्राबरोबरच ठाणे जिल्ह्यातील आदिवासी भागही पेटून उठला. षामराव परूळेकरांच्या मार्गदर्षनाखाली ठाणे जिल्ह्यातील आदिवासी लोकांनी या भागात तारा तोडल्या, पोलिसांच्या गाड्या आडवल्या व आपला निषेध व्यक्त केला. तेव्हा 1200 आदिवासींच्या समवेत षामराव परूळेकर यांना बडोदा येथील तुंरुगात स्थानबध्द केले होते. परंतु हा लढा सुरुच राहिला. पुढे 1 मे 1960 साली संयुक्त महाराष्ट्र स्थापन झाला. तेव्हा ठाणे जिल्ह्यातील उंबरगाव येथील आदिवासींनी षामरावांच्या नेतृत्वाखालील उग्र लढ्या दिला. त्यामुळेच उंबरगाव व आसपासची बहुतांष गावे महाराष्ट्रात ठेवण्यास चळवळीला यष आले. ही सर्व गावे म्हणजे आजचा तलासरी तालुका होय. षामरावांच्या नेतृत्वाखाली दुसरा लढा दिला गेला तो नगरहवेलीच्या मुक्तिसंग्रामाचा. 24 जुलै ते 3 ऑगस्ट 1954 या काळात कम्युनिस्ट पक्ष व किसान सभेच्या नेतृत्वाखाली नगरहवेलीचा दमणगंगेच्या दक्षिणेस असलेल्या 35 गावांचा खानवेल भाग हजारो आदिवासींनी सषस्त्र संघर्ष करुन पोर्तुगीज साम्राज्यवाद्यांच्या जोखडातून मुक्त केला. या ऐतिहासिक लढ्याचे षामराव परूळेकर व गोदुताई परूळेकर यांनी नेतृत्व व मार्गदर्षन केले होते.[13]" ठाणे जिल्ह्यातील आदिवासी, कष्टकरी षेतमजूरांनी कॉ.षामराव परुळेकरांचे व गोदूताई परूळेकरांचे नेतृत्व मान्य करून आपल्या न्यायहक्कासाठी अविरत संघर्ष केला. ठाणे जिल्ह्यातील आदिवासींनी आपल्या समस्या समजून घेऊन आपल्या उध्दारासाठी कॉ.षामरावाना व त्यांच्या पत्नी गोदुताई परूळेकरांना साथ दिली. जो आदिवासी बांधव वर्षानुवर्ष सावकार, जमिनदार यांच्या गुलामगिरीत अडकला होता. त्या सर्व आदिवासी बांधवांमध्ये आत्मसन्मान निर्माण झाला. ठाणे जिल्ह्यातील आदिवासी जमातींनी वेठबिगारी, लग्नगडी व अषा अनेक गुलामगिरीच्या खाईत टाकणाऱ्या पध्दतीचा त्याग केला व स्वतंत्र अस्तित्व जपले. त्यांनी केलेले बंड हे त्यांच्या वेठबिगारी, सावकारषाही, जमिनदारी विरोधातील बंड होते. हे बंड त्यांनी यषस्वी करून त्यांच्यावर लादलेल्या अमानुष छळाचा अंत केला. या आदिवासी बांधवामध्ये आत्मतेज निर्माण झाले. वर्षानुवर्ष मुकपणे अन्याय सहन करणारे, आता संरक्षणासाठी, आपल्या न्यायहक्कासाठी जागृत झाले. ठाणे जिल्ह्यातील या आदिवासींनी आपल्या एकजुटीच्या सामर्थ्याने त्यांचा लढा यषस्वी केला. त्यांच्या लढ्याला षामराव परूळेकर व गोदुताई परूळेकर यांचे नेतृत्व लाभल्यामुळे या आदिवांसीचा लढा अधिक तिव्र झाला. वर्षानुवर्ष या आदिवासींना भोगावा लागणारा अमानुष छळ कमी झाला. पण आजही आदिवासींच्या समस्यापूर्णपणे सुटलेल्या नाहीत. आजही सरकार व समाजसेवी संस्थानी एकत्रितपणे या आदिवासींच्या विकासाकडे विषेष लक्ष देणे आवष्यक आहे.

## संदर्भ ग्रंथ सूचि


1 ढवळे अषोक, कॉ.षामराव आणि कॉ. गोदावरी परुळेकरः असामान्य कर्तृत्वाचे क्रांतीकारक जीवनकार्य,

2 जनषक्ती, वरळी, मुंबई, 2007, पृ. क्र. 8 व 9

3 फडके य.दि., आंबेडकरी चळवळ, श्री विद्या प्रकाषन, पुणे, पृ. क्र. 86 उनि, पृ. क्र. 99.

4 परुळेकर गोदाताई, जेव्हा माणूस जागा होतो, मौज प्रकाषन, पुणे, 2008, पृ. क्र. 75,77

5 तत्रैव, पृ. क्र. 78

6 कडू मोहिनी, भारतीय राजकारणातील स्त्रिया, विजय प्रकाषन, नागपूर, पृ. क्र. 103

7 गोरे गोविंद, सह्याद्रीतील आदिवासी महादेव कोळी, जणवानी प्रकाषन, पुणे, पृ. क्र. 127

8 परुळेकर गोदाताई, जेव्हा माणूस जागा होतो, मौज प्रकाषन, पुणे, 2008, पृ. क्र. 2,3

9 तत्रैव, पृ. क्र. 40,41

10 तत्रैव, पृ. क्र. 80,81

11 तत्रेव, पृ. क्र. 90,91

12 कडू मोहिनी, भारतीय राजकारणातील स्त्रिया, विजय प्रकाषन, नागपूर, पृ. क्र. 103.

13 कोटबागी उषाताई, *तेजस्वी ताराः गोदूताई परुळेकर,* पुणे विद्यार्थी गृह प्रकाषन, पुणे, 2010, पृ. क्र. 195. 196